WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

दैनिक अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | गुरुवार , 17 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 127 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

# "दुष्काळ संहिता शेतकऱ्याच्या हिताची की सरकारच्या हिताची?" : किसान सभेचा सवाल

## पिकासह शेतकऱ्यांच्या आयुष्याची राखरांगोळी ; दुष्काळ जाहीर करा प्रश्नी किसान सभा रस्त्यावर

**परळी / प्रतिनिधी**

किसान सभेच्या वतीने दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी बुधवार दि 16 रोजी सिरसाळा येथेरस्ता रोको आणि तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांनी प्रचंड उन्हात रस्त्यावर ठिय्या दिला.दुष्काळात शेतकऱ्यांसह सर्वसामान्य जनता होरपळून निघत असताना लोकप्रतिनिधी मात्र याबाबत निर्णायक भूमिका घेत दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून शासन दरबारी पाठपुरावा कधी करणार? असे आवाहन शेतकरी आणि किसान सभेने केले. यावेळी लाल बावटा घेऊन शेकडो शेतकरी या रास्ता रोको आंदोलनात सहभागी झाले होते.






मोदी सरकारने २०१६ मध्ये आणलेली दुष्काळ व्यवस्थापन संहिता ही शेतकऱ्याला मदत करण्यासाठी नाही, तर सरकारची तिजोरी वाचवण्यासाठी असल्याचे सांगत या संहितेनुसार सरासरीपेक्षा कमी पाऊस, ४ आठवडे नव्हे तर ८ आठवड्यांचा खंड, जमिनीतील ओलावा संपला, पाणी पातळी खालावली आदी सगळे निकष पूर्ण झाले आहेत तरीही सरकार आकड्यांचा खेळ खेळत आहे. यावर्षी पेरणीला थोडा पाऊस झाला म्हणून शेतकऱ्याने पेरणी केली, बियाणे,खत, फवारणी करून ही पावसाच्या प्रदीर्घ खंडाने 70 ते 90 टक्के पीक वाळून गेल्याने कोरडवाहू हेक्टरी 30 तर बागायती करिता हेक्टरी 70 हजाराची मदत जाहीर करावी अशी मागणी करण्यात आली. मंत्रिमंडळ बैठकीत सरकार कडून दुष्काळ जाहीर होईल अशी आशा असताना पावसाने ताण दिला आहे, ५ ऑक्टोबर नंतरच कापणी अहवाल आणि आणेवारी पाहुनच निर्णय घेता येईल असे मुख्यमंत्र्यानी सांगून सरकारचा वेळकाढूपणा परत जनतेला दाखवून दिला असून जेव्हा नांगर फिरवलेलं सोयाबीन आणि मोडलेला कापूस शेतात आहे, तेव्हा ५ ऑक्टोबर नंतर तुम्ही कोणत्या पिकाचा कापणी अहवाल घेणार? दुष्काळ घोषित करण्यापासूनच पळवाट काढणारा हा डाव असल्याचा किसान सभेने नाराजी व्यक्त केली. मराठवाड्याच्या विकासासाठी सन २०२३ ची ४६ हजार कोटींची घोषणा, वॉटर ग्रीड, नदीजोड प्रकल्प घोषणा केली मात्र मराठवाड्याला वाट्याला किती निधी आणि कार्यवाही काय झाली आला हा प्रश्न अनुत्तरिय आहे.? ५० हजाराच्या कर्जमाफीसाठी सातबारा चूक, बाप मेल्याचे कारण सांगता, पण उद्योगपतींचे २२ हजार कोटी क्षणात माफ करणारे सरकार हे शेती आणि शेतकरी विरोधी असल्याचे सांगत उद्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती दिनी मुख्यमंत्री संभाजीनगरला येत आहेत. त्यांनी तिथेच मराठवाड्याचा दुष्काळ जाहीर करावा.

जर येत्या ८ दिवसात दुष्काळ जाहीर करून मदत जाहीर केली नाही, तर दि २३ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येईल. निजामाला चारी मुंड्या चीत करणारा मराठवाड्याचा शेतकरी या सरकारलाही चीत केल्याशिवाय राहणार नाही असा सज्जड इशारा किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ.ॲड. अजय बुरांडे यांनी यावेळी दिला आहे.

या रास्ता रोको प्रसंगी जिल्हा सचिव कॉ.मुरलीधर नागरगोजे, कॉ.गंगाधर पोटभरे, कॉ.भगवान बडे,कॉ.बळीराम देशमुख, कॉ.विष्णू देशमुख, कॉ.बाबा शेरकर,कॉ.प्रकाश उजगरे, कॉ.मदन वाघमारे, कॉ.प्रवीण देशमुख यांच्यासह शेतकरी, शेतमजूर, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परळी मतदारसंघातील लोखंडी सावरगाव ते बर्दापूर फाटा रस्ता आता होणार चौपदरी, धनंजय मुंडेंच्या मागणीला यश

- **केंद्रीय मंत्री नितीन गडकरींची मंजुरी आणि १०४ कोटी रुपयांच्या कामाची निविदा प्रसिद्ध**
- **अपघातांची वाढती संख्या लक्षात घेत धनंजय मुंडेंनी दिल्लीत नितीन गडकरी यांच्याकडे केली होती मागणी**

**परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)**

परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील बीड व लातूर जिल्ह्यांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ - ब मधील लोखंडी सावरगाव ते लातूर रोडवरील बर्दापूर फाटा या दोन पदरी रस्त्याचे आता चौपदरीकरण होणार असून, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी यासाठी यशस्वी पाठपुरावा केला.

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी या कामास धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार मंजुरी दिली असून सुमारे १७.५० किमी लांबीच्या चौपदरीकरण कामासाठी १०४.४९ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे, तसेच या कामाची निविदा प्रसिद्ध करण्यात आली असल्याने लवकरच कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.

वाढती भरधाव वाहतूक आणि रस्त्यालगतची गावे यामुळे बीड व लातूर या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या या प्रमुख राष्ट्रीय महामार्गावरील बीड जिल्हा हद्द ते लातूर जिल्हा हद्द हा रस्ता दोन पदरी असल्याने नेहमी अपघात घडत होते. याचाच विचार



करून धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हा हद्दीतील या रस्त्याचे लातूर जिल्हा हद्दीप्रमाणेच चौपदरीकरण करण्याची विनंती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे दिल्ली येथे प्रत्यक्ष भेटून केली होती. त्यानुसार या कामाला आता निधी मंजूर करण्यात आला असून, लवकरच बीड जिल्हा हद्दीतील लातूर रोड (लोखंडी सावरगाव ते बर्दापूर फाटा) आता चौपदरी होणार आहे.

याबद्दल श्री मुंडे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत. या रस्त्यापूर्वी धनंजय मुंडे यांनी परळी मतदारसंघातील परळी ते बर्दापूर, परळी ते धर्मापुरी, परळी ते सिरसाळा, परळी ते सोनपेठ, अंबाजोगाई ते मांडेखेल - नाथरा मार्गे सोनपेठ, असे विविध रस्ते चकाचक केले आहेत. तर परळी शहर बायपास व परळी ते गंगाखेड रस्त्याचेही काम अंतिम टप्प्यात आहे. यामुळे परळीकडे येणारे सर्वच रस्ते आता चकाचक झाले आहेत!

# राज्यात पावसाची पूर्ण उघडीप! 17 सप्टेंबरला कोणत्या जिल्ह्यांना मिळणार दिलासा?

**मुंबई : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात मान्सूनच्या शेवटच्या टप्प्यातही पावसाने विश्रांती घेतली आहे. राज्यातील अनेक भागांत अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने पावसाची तूट निर्माण झाली आहे. याचा परिणाम मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांतील शेतीवर होत असून शेतकऱ्यांसमोर पिकांचे नुकसान आणि आर्थिक अडचणींचे आव्हान आहे. त्यामुळे आता परतीच्या पावसाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. 17 सप्टेंबर रोजी कोकण विभागात बहुतांश ठिकाणी हवामान कोरडे, उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता आहे. काही भागांत हलक्या पावसाच्या सरी पडू शकतात. मात्र मोठ्या पावसाचा अंदाज नसून कोणताही पावसाचा अलर्ट देण्यात आलेला नाही.

उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांतही प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याचा अंदाज आहे. काही ठिकाणी उन्हाचा चटका जाणवू शकतो. पश्चिम महाराष्ट्रातील अहिल्यानगर, पुणे, घाटमाथा, सातारा, सांगली आणि सोलापूर परिसरात काही ठिकाणी हलक्या सरींची शक्यता आहे. काही भागांत ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असून उष्ण आणि दमट हवामान जाणवू शकते.







# भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रामटेक निवासस्थानी बाप्पाचे घेतले दर्शन : ना. पंकजाताई मुंडे यांनी केले सर्वांचे स्वागत

**मुंबई वृत्तसंस्था**

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अन्य नेत्यांनी आज रामटेक निवासस्थानी येऊन गणपती बाप्पाचे मनोभावे दर्शन घेतले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सर्व मान्यवर नेत्यांचे हृदयपूर्वक स्वागत केले.

दरवर्षी परंपरेनुसार ना. पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक निवासस्थानी गेल्या सोमवारी विधीवत पूजनाने व प्रचंड उत्साहात श्री ची प्रतिष्ठापना करण्यात आली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आज मुंबई दौऱ्यावर होते, त्यांनी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकाळी रामटेक निवासस्थानी येऊन बाप्पाचे मनोभावे दर्शन घेतले. तत्पूर्वी निवासस्थानी आगमन होताच ना. पंकजाताई मुंडे यांनी नितीन नबीन व फडणवीस यांचे औक्षण करून स्वागत केले. दर्शनानंतर त्यांचा सिध्दिविनायकाची सुंदर व आकर्षक मूर्ती भेट देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित भाजपचे राष्ट्रीय सह संघटनमंत्री शिव प्रकाशजी, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा आदींचा ना. पंकजाताई मुंडे यांनी स्वागत व सत्कार केला.

राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी आज माझ्या निवासस्थानी भेट देऊन बाप्पाचे दर्शन घेतले याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांनी आनंद व्यक्त केला. युवा मोर्चात काम करताना नबीन यांच्या संघटन कौशल्याचा आपल्याला अनुभव आहे, आज ते राष्ट्रीय अध्यक्ष पदापर्यंत पोहोचले आहेत, ही निश्चितच माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे असं सांगत त्यांनी त्यांच्या भविष्यातील प्रवासाला शुभेच्छा व्यक्त केल्या.

संपादकीय

# जेथे जाऊ तेथे...

तुकाराम मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. मुंढेंनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना 'सील' करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच.

सध्या बहुचर्चित असलेल्या 'जेन झी'च्या आंदोलनाचं नेतृत्व करणारा अभिजीत दीपके हा तरुण महाराष्ट्राचा असल्याने देशातील माध्यमं महाराष्ट्राची वेगळ्या पद्धतीने नोंद घेत असताना महाराष्ट्राचे डोळे सध्या दिपले आहेत, ते मात्र तुकाराम मुंढे या सनदी अधिकाऱ्याच्या कामगिरीने. मुंढे यांची २१ वर्षांची संपूर्ण कारकीर्द वादळी आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच. मुंढे यांची महाराष्ट्रात पहिली प्रसिद्धी आहे, ती त्यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्यांनी. राज्यात सरकार कुणाचंही असो, मुख्यमंत्री कोणीही असो, मुंडेंना कधीच कुठल्या विभागात वर्षभर ठेवता येत नाही! त्यांच्यावर भ्रष्टाचार, अनियमिततेचे आरोप होत नाहीत. नियमबाह्य कामाबाबत त्यांच्यावर कुठे ठपका नाही. ठपका असलाच, तर काळवेळ न पाहता प्रत्येक गोष्ट नियमातील शब्दांनुसार घेण्याबाबत आहे. नियमावली आणि कायदा ते फक्त शब्दार्थाने जाणतात. भावार्थ समजून घेण्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यामुळे, त्यांचा कारभार अनेकदा आततायी होतो. लोकप्रतिनिधी, संबंधित विभागाला त्याचीच अडचण होऊ लागते. परिस्थितीनुरूप कायदे लवचिकपणे वाकवण्याची सवय झालेल्या सगळ्यांनाच त्याचा त्रास होतो.

मुंढे यांच्या विरोधातल्या तक्रारींना तिथून सुरुवात होते. मुंढे डावं-उजवं करण्याच्या फंदात पडत नाहीत. समोर आलेली फाईल कोणाशी, कशाशी संबंधित आहे, याचाही विचार करत नाहीत. त्यामुळे, त्यांच्यावर आप-परभावाचा आरोपही करता येत नाही. लोकशाहीत प्रशासन जनतेला जबाबदार असतं. लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधी असतात. त्यांच्या भूमिका, त्यांची बाजू समजून घेण्याची गरज मुंडे यांना वाटत नाही. ते कोणाला भेटत नाहीत. बहुतेक वेळा कोणाचे फोन घेत नाहीत; कोणाला उलट फोन करत नाहीत, अशी त्यांच्या वर्तणुकीबाबतच्या तक्रारींची बरीच मोठी यादी आहे. ती सहसा बातम्यांत येत नाही. सर्वसामान्य माणसाला प्रशासनाचा जो अनुभव येतो, त्या तुलनेत मुंढेंची शैली त्याला फार भारी वाटते. मुंढेंसारखा नि:स्पृह अधिकारी नाही, अशीच त्यांची प्रतिमा झाली आहे. आषाढी वारीदरम्यान काहींनी त्यांच्या नांवाचा योग साधून त्यांना थेट 'आधुनिक संतश्रेष्ठ तुकाराम महाराजां'ची उपमा दिली. काहींनी त्यांच्या प्रतिमेला दुधाचा अभिषेक केला. त्यांच्यावर मराठीत येऊ घातलेल्या पुस्तकाच्या एक लाख प्रतींची नोंदणी प्रकाशनापूर्वीच झाली आहे, असं म्हणतात. एखाद्या अधिकाऱ्याच्या वाटेला क्वचितच येणारं हे स्तुतीगानही टोकाचंच म्हणावं लागेल.

मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. तिथे असलेल्या अधिकारांचा उपयोग करून त्यांनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना 'सील' करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. मुंबईतल्या जुन्या, प्रसिद्ध ब्रँडना टाळी ठोकल्याने, मोठमोठ्या-मातब्बर क्लबना नियम भंगांच्या आरोपाखाली खेचल्याने, अनेक सरकारी-न्यायालयीन इमारतींतील उपाहारगृहांनाही कायद्याचा बडगा दाखवल्याने अनेक प्रतिष्ठितांचे धाबे दणाणले आहेत. शाळांच्या आवारात आणि शाळांच्या आवारापासून ५० मीटरपर्यंतच्या परिसरात 'जंक फुड'ला बंदी केल्याने मुंढे आता मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या रडारवर आले असतील. 'जेथे जाऊ तेथे देऊ खळबळ उडवून' या बाण्याने मुंढेंचं काम सुरू असलं, तरी त्यामुळे प्रशासनाच्या वरिष्ठ वर्तुळात नेहमीच नाराजी असते. राज्यातले बाकी सगळे अधिकारी तडजोडी आणि दबावाखाली सहज झुकणारे असून मुंडे तेवढे नि:स्पृह, निर्भय आणि निष्पक्ष असल्याचं चित्र निर्माण होतं, असा या वर्तुळाचा आक्षेप असतो.

लिखित कायद्याव्यतिरिक्तही वस्तुस्थिती असते. अधिकारांचा वापर करताना तिचा सारासार विचार करावा लागतो. व्यवहार्यता लक्षात घ्यावी लागते. तरच कायद्याची विवेकी अंमलबजावणी शक्य होते, असं या अधिकाऱ्यांचं म्हणणं असतं. मुंडे यांचा कामाचा वेग आणि धडाका यामुळे ते ज्या विभागात जातात, तिथे अचानक कामाचा ताण येतोच; पण त्याहीपेक्षा वेगळ्या कार्यशैलीने कर्मचारी, कनिष्ठ अधिकारी वर्गात आहे बैचेनी पसरते. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या छत्रपती संभाजी नगर येथील चाचणी प्रयोग शाळेतील कर्मचाऱ्यांनी अशाच मुद्द्यावरून तक्रार केली आहे. सरकारी कामात पाळ्यांनुसार, अधिक काम कसं येतं? असा प्रश्न त्यांना पडला आहे. मंत्री म्हणून या विभागाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते नरहरी झिरवळही मुंढे यांच्या एककल्ली, धडक मोहिमांवर खूश नाहीत. त्यांचंही काही दुःख आहेच. हे सगळं प्रकरण त्यामुळे येत्या काही दिवसांत मुख्यमंत्र्यांसमोर जाण्याची शक्यता दिसते आहे. मुंढे यांच्या कार्यशैलीबद्दल आक्षेप असले, तरी त्यांच्या 'दे धडक' पणामुळेच एरवी ज्याला हात लागला नसता, अशा कारवाया होतात हेही खरंच आहे. देशातलं दुधाचं एकूण उत्पादन, त्याचा विविध कारणांसाठी होणारा वापर आणि बाजारातील पनीरची उपलब्धता याचं गणित जुळत नाही, अशी चर्चा अनेक जण करत होते. पण, दूध भेसळीला हात घातला मुंढे यांनीच. मिठाईतली भेसळ, फळांना चढणारे कृत्रिम, घातक रंग आणि मेणाचे थर, पाकिटावर दिलेली माहिती आणि आतील पदार्थांतील तफावत, जागोजागी अस्वच्छता आणि बेफिकिरी- या सगळ्याला मुंढे यांनीच हात घातला आहे. सामान्य माणसाला ते खूप आश्वासक वाटतं. धाडी आणि त्याच्या बातम्या ही एक बाजू आहे आणि आरोपांची सिद्धता, कारवाईची वैधता ही दुसरी बाजू. या दुसऱ्या बाजूला सुरुवात होण्यापूर्वीच मुंढे यांची बदली झाली, तर नंतर हे सगळं निस्तरायचं कोणी? असा प्रश्न त्या विभागातल्या अधिकाऱ्यांना पडला आहे. तोही खराच आहे.

# गौरीपूजन सण : कौटुंबिक आणि सांस्कृतिक परंपरा : डॉ. सुवर्णा कराड

महाराष्ट्राच्या सण-उत्सवांच्या परंपरेत गणेशोत्सवाला विशेष स्थान आहे. गणपतीच्या आगमनानंतर येणारा ज्येष्ठा गौरीपूजनाचा सण या उत्सवाला कौटुंबिक आणि सांस्कृतिक भावनेची जोड देतो. गौरीचे आगमन, स्वागत, साजशृंगार, पूजन, नैवेद्य, आरती, नातेवाईकांचे आगमन आणि निरोप या सर्व प्रक्रियेत धार्मिक श्रद्धेबरोबरच कौटुंबिक जिव्हाळा, स्त्रीचे स्थान, माहेरपणाची भावना, अन्नसंस्कृती आणि परंपरेचे सातत्य दिसते.

गौरीपूजनाची पद्धत घराणे, प्रदेश आणि स्थानिक रूढीनुसार बदलते. अनेक घरांत ज्येष्ठा आणि कनिष्ठा अशा दोन गौरींची स्थापना केली जाते. काही ठिकाणी मुखवटे किंवा मूर्ती वापरल्या जातात, तर काही ठिकाणी गौरीचे प्रतीक वेगळ्या पद्धतीने तयार केले जाते. ही विविधता महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीची महत्त्वाची ओळख आहे.

गौरीपूजनातील सर्वांत भावपूर्ण संकल्पना म्हणजे गौरीचे माहेरपण. अनेक कुटुंबांत गौरीला माहेरी आलेली मुलगी मानले जाते. त्यामुळे तिचे आगमन देवतेच्या स्वागतापुरते मर्यादित न राहता घरच्या लेकीच्या आगमनासारखे होते. "गौराई आली",कशाचा पायी ?

१) हाळदी कुंकाचा पायी ,
२) धनधान्याचा पायी
३)सोनपावलांचा पायी
४) सुख समृद्धी पायी
५) सुन लेकीच्या पायी

"माहेरपणाला आली" अशा शब्दांतून ही भावना व्यक्त होते. तिचे औक्षण, साजशृंगार आणि पूजनही त्याच प्रेमाने केले जाते.

ही परंपरा स्त्रीजीवनाशीही जोडलेली आहे. विवाहानंतर मुलीचे माहेरी येणे पूर्वी विशेष भावनिक प्रसंग मानले जात असे. गौरीच्या निमित्ताने माहेर-सासरच्या नात्यांची आठवण होत असे आणि कुटुंबीय एकत्र येत. आजही मुली, सुना, बहिणी आणि नातेवाईक या सणासाठी एकत्र येतात. बदलत्या जीवनशैलीत अशा भेटींना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

गौरीच्या आगमनापूर्वी घराची स्वच्छता आणि सजावट केली जाते. रांगोळी, फुले, तोरणे आणि कुंकवाची पावले यांद्वारे मंगल वातावरण निर्माण केले जाते. ही सजावट घरात मंगलता आणि समृद्धीचे आगमन झाल्याचे प्रतीक मानली जाते.

साडी, दागिने, फुले, हार, कुंकू आणि अलंकारांनी गौरी सजवली जाते. विशेषतः घरातील स्त्रिया या तयारीत उत्साहाने सहभागी होतात. या परंपरेत स्त्रीला सन्मान, प्रतिष्ठा आणि शक्तीचे प्रतीक मानणारी सांस्कृतिक भावना व्यक्त होते.

नैवेद्यालाही विशेष महत्त्व आहे. घरातील धान्य, भाज्या, फळे आणि विविध पदार्थांपासून तो तयार केला जातो. काही कुटुंबांत गौरीसाठी स्वतंत्र ताट मांडले जाते. अन्नामागील शेतकरी, कामगार आणि स्वयंपाक करणाऱ्या व्यक्तींच्या श्रमांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची ही संधी असते. त्यामुळे अन्नाचा आदर आणि श्रमाची प्रतिष्ठा यांचा संदेशही या सणातून मिळतो.

पूर्वी गौरीपूजन हा संयुक्त कुटुंबातील घरकेंद्रित उत्सव होता. आजी-आजोबा, काका-काकू, भाऊ-बहिणी आणि इतर नातेवाईक एकत्र येत. मोठ्यांकडून मुलांना पूजा, नैवेद्य, सजावट आणि परंपरेमागील कथा समजत. अशा प्रकारे सण हे अनौपचारिक शिक्षण आणि सांस्कृतिक संस्कारांचे माध्यम बनत. आज संयुक्त कुटुंबांची संख्या कमी झाली असून शिक्षण, नोकरी आणि व्यवसायामुळे अनेक जण वेगवेगळ्या शहरांत राहतात. वेळेअभावी काही विधी साधे झाले आहेत; तरीही कुटुंबे उपलब्ध परिस्थितीनुसार ही परंपरा पुढे नेत आहेत. आधुनिक सजावट आणि नव्या पद्धतींचा समावेश झाला असला, तरी तिचा भावनिक गाभा कायम आहे.

सामाजिक माध्यमांमुळे गौरी आगमन, पूजन, नैवेद्य आणि शुभेच्छांची माहिती क्षणार्धात पसरते. यामुळे परंपरेचा प्रसार होतो; मात्र सजावट, दागिने किंवा उत्सवाच्या भव्यतेची तुलना करण्याची प्रवृत्तीही वाढते. परंपरा प्रदर्शनाची स्पर्धा नसून अनुभवण्याची आणि पुढे नेण्याची गोष्ट आहे, हे



लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

गौरीला शक्तीचे प्रतीक मानताना घरातील स्त्रीच्या प्रत्यक्ष श्रमांचा आणि योगदानाचा सन्मानही झाला पाहिजे. गौरीची पूजा एका दिवसापुरती मर्यादित न राहता स्त्रीचा सन्मान, समान सहभाग आणि निर्णयक्षमता दैनंदिन जीवनातही दिसली पाहिजे. हाच या परंपरेचा आधुनिक अर्थ आहे.

परंपरा टिकवण्यासाठी तिचा अर्थ पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. गौरीला माहेरवाशीण का मानले जाते, आपल्या घरात ही परंपरा कधीपासून आहे, ज्येष्ठा-कनिष्ठा गौरी म्हणजे काय आणि नैवेद्याला महत्त्व का आहे, हे मुलांना समजावून सांगितले पाहिजे. परंपरेचा अर्थ समजला तरच ती टिकते.

या सणातून पर्यावरणाची जाणीवही वाढवता येते. प्लास्टिकची सजावट कमी करणे, स्थानिक व पुनर्वापरयोग्य वस्तू वापरणे, अन्नाचा अपव्यय टाळणे आणि निर्माल्याची योग्य विल्हेवाट लावणे सहज शक्य आहे. साधेपणा उत्सवाचे महत्त्व कमी करत नाही; उलट तो त्याला अधिक अर्थपूर्ण बनवतो. गौरीपूजन म्हणजे भूतकाळाची केवळ पुनरावृत्ती नव्हे. परंपरेतील चांगली मूल्ये जपत बदलत्या काळाशी जुळवून घेणे ही खरी सांस्कृतिक जाणीव आहे. बाह्य रूप किंवा पूजेच्या पद्धती बदलल्या तरी कौटुंबिक जिव्हाळा, स्त्रीचा सन्मान, अन्नाबद्दल कृतज्ञता, श्रमाची प्रतिष्ठा, नातेसंबंधांची जपणूक आणि सांस्कृतिक सातत्य ही मूल्ये टिकली पाहिजेत. आजच्या धावपळीच्या जीवनात कुटुंबाला एकत्र आणणारा गौरीपूजनाचा प्रसंग धार्मिकतेच्या पलीकडे जाऊन सांस्कृतिक अनुभव बनतो. ज्येष्ठांच्या आठवणी, महिलांचा उत्साह, मुलांचा सहभाग, नातेवाईकांच्या भेटी आणि एकत्र केलेला नैवेद्य यामुळे कुटुंबातील बंध दृढ होतात. म्हणून गौरीपूजनाकडे केवळ एका दिवसाचा धार्मिक विधी म्हणून न पाहता महाराष्ट्राच्या कौटुंबिक आणि सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहिले पाहिजे. मागील पिढ्यांनी जपलेली ही परंपरा आजच्या पिढीने समजून घ्यावी आणि तिची मूल्ये उद्याच्या पिढीपर्यंत पोहोचवावीत. गौरीचे स्वागत घरात करूया आणि तिच्या रूपाने येणाऱ्या मूल्यांचे स्वागत जीवनातही करूया. या सणाची खरी समृद्धी सजावटीत नव्हे, तर कुटुंबातील प्रेमात; नैवेद्याच्या वैभवात नव्हे, तर अन्नाच्या आदरात; दागिन्यांच्या झगमगाटात नव्हे, तर स्त्रीच्या सन्मानात; आणि परंपरा सांगण्यात नव्हे, तर ती अर्थपूर्णपणे पुढे नेण्यात आहे. याच अर्थाने गौरीपूजन सण हा महाराष्ट्राच्या कौटुंबिक जिव्हाळ्याचा आणि सांस्कृतिक सातत्याचा उत्सव आहे.

■ **डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी महाराष्ट्र राज्य.**

# राज्य माहिती आयोगाच्या दोन आदेशांनंतरही माहिती प्रलंबित; महावितरणच्या अधिकाऱ्यावर ₹२५ हजारांची शास्ती

■ **परळी /प्रतिनिधी**


परळी येथील कथित वीजबिल घोटाळा प्रकरणाच्या फेरचौकशी अहवालानुसार दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर करण्यात आलेल्या कारवाईची माहिती मागणाऱ्या माहिती अधिकार अर्जावर माहिती न दिल्याप्रकरणी राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी महावितरणच्या तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्यावर ₹२५ हजारांची शास्ती अंतिम केली आहे.

बालाजी अण्णासाहेब गित्ते यांनी १८ सप्टेंबर २०२५ रोजी महावितरणच्या अंबाजोगाई कार्यालयाकडे RTI अर्ज दाखल केला होता. अर्जासोबत २४ सप्टेंबर २०२४चे महावितरणचे पत्र जोडण्यात आले होते. या पत्रात परळी वीजबिल घोटाळा प्रकरणातील फेरचौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करून अहवाल सादर करण्याचे निर्देश असल्याचे नमूद आहे.

माहिती न मिळाल्याने गित्ते यांनी २५ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रथम अपील आणि त्यानंतर १५ डिसेंबर २०२५ रोजी द्वितीय अपील क्र. ५७५४/२०२५ दाखल केले. १३ जानेवारी २०२६ रोजी आयोगासमोर सुनावणी झाली.

त्यानंतर आयोगाने ६ मार्च २०२६ रोजी जावक क्र. ३१२६ अन्वये आदेश देत, कार्यालयाकडे उपलब्ध व कायद्यानुसार देय असलेली माहिती आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत RTI कलम ७(६) नुसार विनामूल्य देण्याचे निर्देश दिले. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्याकडून खुलासाही मागविण्यात आला.

मात्र आयोगाच्या पुढील निर्णयानुसार खुलासा सादर न केल्याने १५ जून २०२६ रोजी जावक क्र. ६३९० अन्वये संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यावर ₹२५ हजारांची शास्ती



राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्र.५७५४/२०२५ मधील खुलासा निर्णय

श्री. बालाजी आण्णासाहेब गित्ते,
रा. स्नेह नगर, परळी वै., जि. बीड-४३१५१५.
मो. नंबर-८९९९६६१३१३. अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
अति. कार्यकारी अभियंता,
महावितरण विभाग कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महावितरण विभाग कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड : उत्तरवादी क्र.२

(निर्णय दिनांक ०७.०४.२०२६)

संदर्भ:- द्वितीय अपील क्र.५७५४/२०२५, सुनावणी दिनांक १३.०१.२०२६ रोजीचे आदेश.जावक क्र./३१२६, दि.०६.०३.२०२६ (नोंदणीकृत टपालाने)

संदर्भीय द्वितीय अपिलावर आयोगाने दि.१३.०१.२०२६ रोजी सुनावणी घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा अति. कार्यकारी अभियंता, महावितरण विभाग कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड अनुपस्थित आहेत.

"संबंधित जन माहिती अधिकारी तथा अति. कार्यकारी अभियंता, महावितरण विभाग कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड यांनी विहित मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध कलम अधिनियमातील कलम १९(८)(ग) व २०(१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच दिनांक ०७.०४.२०२६ रोजी द्वितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल."

प्रस्तुत प्रकरणात, संदर्भीय द्वितीय अपील निर्णयाची प्रत नोंदणीकृत डाकेने पाठवून संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांची बाजु लेखी व तोंडी स्वरुपात मांडण्याकरिता वाजवी संधी देण्यात आलेली आहे. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांना अशी वाजवी संधी दिल्यानंतर त्यांनी त्यांचा खुलासा प्रत्यक्ष अथवा पोस्टाद्वारे आयोगाकडे सादर केला असल्याचे दिसून येत नाही. तसेच द्वितीय अपिलाच्या निर्णयात नमूद केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी आज रोजी आयोगासमोर तोंडी स्वरुपात बाजू मांडण्याकरिता कोणत्याही पूर्व परवानगीशिवाय अनुपस्थित आहेत. यावरुन या संदर्भात त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात संदर्भीय निर्णयामध्ये नमुद केल्याप्रमाणे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना त्यांची

अंतिम करण्यात आली. ही रक्कम वसूल करण्याची जबाबदारी अधीक्षक अभियंता, महावितरण, बीड यांच्यावर निश्चित करण्यात आली आहे. प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने सुनावणी न घेतल्याने कलम १९(६) चा भंग झाल्याची नोंदही आयोगाने केली असून संबंधित प्रशासकीय कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, गित्ते यांच्या म्हणण्यानुसार, १६ सप्टेंबर २०२६पर्यंत मूळ RTI अर्जातील मागितलेली माहिती पूर्णपणे मिळालेली नाही. विशेषतः २४ सप्टेंबर २०२४च्या पत्रानुसार फेरचौकशी अहवालातील दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर प्रत्यक्ष कोणती कारवाई झाली, कारवाईचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाला सादर झाला का, तसेच संबंधित आदेश व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती याबाबतची माहिती अद्याप प्रलंबित असल्याचा त्यांचा दावा आहे. त्यामुळे आता आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी, ₹२५ हजारांच्या शास्तीची वसुली आणि २४ सप्टेंबर २०२४च्या पत्रानुसार झालेल्या प्रत्यक्ष कारवाईचा अधिकृत अहवाल याकडे लक्ष लागले आहे.

# 'भाईजान' आता दिसणार कर्णाच्या भूमिकेत? सलमान खानच्या आगामी चित्रपटाची सर्वत्र चर्चा

■ **मुंबई : प्रतिनिधी**

सध्या 'हनुमान अंश' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगलीच चर्चा रंगवत आहे. त्यातच अभिनेता रणबीर कपूरची बहुप्रतीक्षित 'रामायण' फिल्महीं लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात रणबीर कपूर प्रभू रामाच्या भूमिकेत, तर सनी देओल हनुमानाच्या भूमिकेत दिसणार आहे. आता या यादीत आणखी एका बॉलिवूड अभिनेत्याचे नाव जोडले जात असून, सलमान खानही एका पौराणिक व्यक्तिरेखेत दिसण्याची शक्यता आहे.

बॉलिवूडमध्ये 'दबंग' आणि 'भाईजान' म्हणून ओळखला जाणारा सलमान खान आपल्या कारकिर्दीत प्रामुख्याने अ‍ॅक्शन, रोमँटिक आणि दमदार भूमिका साकारताना दिसला आहे. मात्र, आता तो एका वेगळ्या आणि पौराणिक भूमिकेत प्रेक्षकांसमोर येण्याची चर्चा आहे. एकीकडे त्याचा वॉर चित्रपट 'मातृभूमी' सेन्सॉरशिपशी संबंधित अडचणी आणि प्रदर्शनाबाबतच्या अनिश्चिततेमुळे चर्चेत आहे. दुसरीकडे, दिग्दर्शक राकेश ओमप्रकाश मेहरा यांच्यासोबतच्या त्याच्या आगामी प्रोजेक्टचीही जोरदार चर्चा सुरू आहे.

## सलमान साकारणार कर्णाची भूमिका?

एका विशेष वृत्तानुसार, सलमान खान राकेश



ओमप्रकाश मेहरा यांच्या आगामी चित्रपटात महाभारतातील कर्णाची भूमिका साकारताना दिसू शकतो. या वृत्तानंतर सलमानच्या चाहत्यांमध्ये आणि सोशल मीडियावर या प्रोजेक्टबाबत उत्सुकता वाढली आहे.

यापूर्वी याच वर्षी जूनमध्ये 'बॉलिवूड हंगामा'ने दिलेल्या वृत्तानुसार, राकेश ओमप्रकाश मेहरा यांनी सलमान खानला एका चित्रपटाची पटकथा ऐकवली होती. सूत्रांच्या माहितीनुसार, ही कथा सलमानला इतकी आवडली की त्याने कथानक ऐकल्यानंतर या प्रोजेक्टला तात्काळ होकार दिला.

सलमान आणि राकेश ओमप्रकाश मेहरा पहिल्यांदाच एकत्र या प्रोजेक्टच्या निमित्ताने सलमान खान आणि राकेश ओमप्रकाश मेहरा पहिल्यांदाच एकत्र काम करणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या जोडीच्या आगामी चित्रपटाकडेही प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे.

या चित्रपटाची निर्मिती फरहान अख्तरच्या 'एक्सेल एंटरटेनमेंट' या निर्मिती संस्थेअंतर्गत केली जाणार असल्याची माहिती आहे. मात्र, चित्रपटाच्या कथानकाबाबत निर्मात्यांकडून अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

## महाभारतावर आधारित चित्रपट की आधुनिक कथा?

दरम्यान, सलमान खान कर्णाच्या भूमिकेत दिसणार असल्याच्या चर्चेनंतर सोशल मीडियावर चित्रपटाच्या कथेबाबत विविध तर्कवितर्क सुरू झाले आहेत. हा चित्रपट महाभारताच्या मूळ कथेवर आधारित असेल की या पौराणिक कथेला आधुनिक काळाच्या पार्श्वभूमीवर नव्या पद्धतीने मांडले जाईल, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

निर्मात्यांनी चित्रपटाची कथा, पात्रांची रचना किंवा इतर तपशील अधिकृतपणे जाहीर केलेले नाहीत. त्यामुळे या प्रोजेक्टबाबतची अधिकृत घोषणा आणि पुढील अपडेट्सची प्रेक्षकांना प्रतीक्षा आहे. मात्र, सलमान खान आणि राकेश ओमप्रकाश मेहरा यांची जोडी तसेच कर्णासारखी महत्त्वाची पौराणिक व्यक्तिरेखा यामुळे हा प्रोजेक्ट सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.

## परळीत भटक्या कुत्र्यांचा उच्छाद ! ५० जणांवर कुत्र्यांनी चावा घेतल्याची माहिती

# निर्बीजीकरणावर लाखो रुपयांचा खर्च, मात्र नागरिकांवरील कुत्र्यांच्या हल्ल्यांचे सत्र सुरूच






परळी | प्रतिनिधी

परळी शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. बरकत नगर, साठे नगर, आझाद नगर, वसंत नगर, मंदिर परिसर, आंबेवेस, भुई गल्ली यासह शहरातील अनेक भागांमध्ये कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे.

लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना समोर येत आहेत. परळी येथील उपविभागीय रुग्णालयात चौकशी केली असता, आज दुपारपर्यंत जवळपास ५० जणांना कुत्र्यांनी चावा घेतल्याची माहिती परळी येथील उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकडून देण्यात आली.

दरम्यान, शहरातील भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी नगरपालिका मोठ्या प्रमाणावर खर्च करत असल्याचे सांगितले जाते. निर्बीजीकरणाच्या कामांचे फोटो आणि व्हिडिओ प्रसिद्ध केले जात असताना, प्रत्यक्षात नागरिकांवर कुत्र्यांचे हल्ले होत असल्याने या मोहिमेच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.निर्बीजीकरणाच्या कामांचे फोटो-व्हिडिओ अपलोड करण्याबरोबरच, कुत्र्यांच्या चाव्यामुळे रुग्णालयात उपचार घेणाऱ्या नागरिकांची संख्या आणि या समस्येवर केलेल्या उपाययोजनांची माहितीही नगरपालिका प्रशासनाने नागरिकांसमोर मांडावी.

शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असताना, परळी नगरपालिकेचे प्रशासन या समस्येकडे ठोसपणे लक्ष कधी देणार? असा सवाल परळीकरांकडून उपस्थित केला जात आहे.

भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त, निर्बीजीकरण मोहिमेची परिणामकारकता आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत नगरपालिका प्रशासनाची अधिकृत भूमिका काय आहे, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

या घटनांनंतर सायंकाळच्या वेळी नगरपालिका प्रशासनातील कर्मचाऱ्यांनी या कुत्र्यास ताब्यात घेतल्याची माहिती मिळत आहे. परंतु अशा प्रकारचे आणखीन किती कुत्रे आहेत जे लोकांचा चावा घेत आहेत याबाबत माहिती अद्याप स्पष्ट झालेले नाही.

लोकजागर

# लोकसेवार्थ : गणेशोत्सवातून समाजसेवेची वाटचाल

गणेशोत्सव म्हटला की भक्ती, श्रद्धा, उत्साह आणि सामाजिक एकजुटीचे वातावरण डोळ्यांसमोर उभे राहते. मात्र मुंबईतील काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या उत्सवाला केवळ धार्मिक स्वरूप न देता त्याला सामाजिक बांधिलकीची जोड दिली आहे. किंग्ज सर्कल येथील GSB सेवा मंडळ हे त्याचे एक महत्त्वपूर्ण उदाहरण आहे.गणेशोत्सवाच्या भव्य आयोजनासाठी देश-विदेशात प्रसिद्ध असलेल्या या मंडळाची सामाजिक कार्याची परंपरा मात्र केवळ उत्सवापुरती मर्यादित नाही. शिक्षणासाठी मदत, वैद्यकीय सहाय्य, अन्नदान, रक्तदान, युवकांना मार्गदर्शन, आपत्तीच्या काळातील मदत, अंत्यसंस्कार सेवा आणि गरजू कुटुंबांना सहाय्य अशा विविध क्षेत्रांत मंडळ काम करत आहे. मंडळाची स्थापना 1951 मध्ये झाली असून ते नोंदणीकृत ना-नफा संस्था आहे.

GSB सेवा मंडळाच्या सामाजिक कार्याची सुरुवात अत्यंत साध्या आणि संवेदनशील सेवेतून झाली. 1951 मध्ये काही समाजबांधवांनी एकत्र येऊन गरजू कुटुंबांना अंत्यसंस्कार आणि संबंधित विधींमध्ये मदत करण्यासाठी मंडळाची स्थापना केली. त्या काळात स्वयंसेवक आठवड्यातून एकदा एकत्र येत आणि पुढे भक्ती, भजन तसेच विविध सेवाकार्याशी जोडले गेले.

त्यामुळे सुरुवातीच्या काळात GSB सेवा मंडळ हे 'अंत्यसंस्कारासाठी मदत करणारी संस्था म्हणून ओळखले जाऊ लागले. कालांतराने या सेवाकार्याचा विस्तार शिक्षण, आरोग्य आणि विविध सामाजिक उपक्रमांपर्यंत झाला.

समाजाच्या प्रगतीचा पाया शिक्षण आहे, या भूमिकेतून GSB सेवा मंडळाकडून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केली जाते. आर्थिक अडचणीमुळे मुलांचे शिक्षण थांबू नये, हा या मदतीमागचा प्रमुख हेतू आहे.2026-27 या शैक्षणिक वर्षासाठी मंडळाने फ्री शिक्षण फंड अंतर्गत शैक्षणिक शुल्कासाठी मदतीची प्रक्रिया सुरू केली आहे. मुंबई, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि ठाणे जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणापर्यंत या योजनेत अर्ज करता येतो. ही मदत केवळ गुणवत्तेवर आधारित शिष्यवृत्ती नसून आर्थिकदृष्ट्या मदतीची गरज असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे.मंडळाच्या गणेशोत्सवातील उपक्रमांमध्ये दहावी, बारावी, पदवी,



पदव्युत्तर आणि व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याची परंपराही आहे. अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला सामाजिक मान्यता आणि प्रोत्साहन मिळते.

शिक्षणाबरोबरच आरोग्य क्षेत्रातही मंडळाने दीर्घकालीन कामाची दिशा स्वीकारली आहे. मीरा-भाईंदरमधील वर्सावे येथे 100 खाटांचे मल्टी-स्पेशालिटी चारीतेबल हॉस्पिटल उभारण्याचा प्रकल्प मंडळाने हाती घेतला आहे.या रुग्णालयाचा उद्देश दर्जेदार आरोग्यसेवा सर्वसामान्यांना परवडणाऱ्या खर्चात उपलब्ध करून देणे हा आहे. मंडळाच्या माहितीनुसार या प्रकल्पासाठी आवश्यक नियामक मंजुरीच्या प्रक्रियेवर काम सुरू असून हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.गणेशोत्सव मंडळाच्या माध्यमातून रुग्णालयासारखी कायमस्वरूपी सामाजिक सुविधा उभारण्याचा प्रयत्न ही या संस्थेच्या कार्यातील महत्त्वाची बाब मानावी लागेल.

कोरोना महामारीच्या काळात अनेक कुटुंबांवर आर्थिक आणि सामाजिक संकट कोसळले. रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अशा काळात GSB सेवा मंडळाने 'अन्नदान सेवा सुरू केली.मुंबई आणि ठाणे परिसरातील विविध सार्वजनिक रुग्णालयांच्या आसपास रुग्णांच्या नातेवाईकांना भोजन उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात आले. मंडळाच्या सभागृहाचा वापर अन्नपदार्थांचे पॅकेट तयार करण्यासाठी करण्यात आला. गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांना अन्नपदार्थांसोबत किराणा साहित्याचेही वाटप करण्यात आले.महत्त्वाचे म्हणजे कोविडनंतरही अन्नदानाची ही सेवा पूर्णपणे थांबलेली नाही..GSB सेवा मंडळाच्या 1951 पासूनच्या वाटचालीतून हीच बाब अधोरेखित होते—गणपतीची भक्ती ही केवळ दर्शनापुरती न राहता माणसाच्या सेवेत उतरली, तर गणेशोत्सवाला खऱ्या अर्थाने सामाजिक आशय प्राप्त होतो.

# शून्यातून विश्व : नाशिकचा तरुण भरड धान्यातून कमावतोय लाखो रुपये

आयुष्यात मोठं काही तरी करण्यासाठी लाखो-करोडो रुपयांच्या भांडवलाची गरज नसते, तर तुमच्याकडे एक अनोखी कल्पना आणि ती प्रत्यक्षात आणण्याची जिद्द असायला हवी. नाशिकच्या तुषार तलवार या मेकॅनिकल इंजिनिअरने हे सिद्ध करून दाखवलं आहे. २०२० मध्ये जेव्हा संपूर्ण जग कोरोना महामारी आणि लॉकडाऊनच्या भीषण संकटाचा सामना करत होते, तेव्हा तुषार यांनी अवघ्या ३,५०० रुपयांच्या पुंजीतून एका व्यवसायाची पायाभरणी केली. आज त्यांच्या याच छोट्या उद्योगाचे रूपांतर फूडोनिक या लोकप्रिय ब्रँडमध्ये झाले आहे. या कंपनीची वार्षिक उलाढाल तब्बल १. ५ कोटी रुपयांच्या घरात पोहोचली आहे.

तुषार यांच्या या यशस्वी प्रवासाची सुरुवात अतिशय रंजक आहे. नवी मुंबईत अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असताना, त्यांच्या आरोग्याविषयीच्या जागरूकतेमुळे एका मित्राने त्यांना फूड इंडस्ट्रीमध्ये काहीतरी करण्याचा सल्ला दिला. त्यानंतर आयआयटी बॉम्बे येथील एका चर्चासत्राने त्यांच्या आयुष्याला कलाटणी दिली. या सेमिनारमध्ये भरड धान्य क्षेत्रातील नामवंत संशोधक डॉ. खादर





वली यांचे मार्गदर्शन तुषार यांना लाभले. भरड धान्याचे मानवी शरीरासाठी असणारे फायदे आणि बाजारातील मिलेट उत्पादनांची कमतरता या गोष्टी तुषार यांच्या वेळीच लक्षात आल्या. या क्षेत्राची सखोल माहिती घेण्यासाठी त्यांनी अनेक कोर्सेस आणि सेमिनारचा आधार घेतला.

व्यवसायाची सुरुवात करण्यासाठी तुषार यांनी कोणतीही घाई केली नाही किंवा मोठे कर्ज काढले नाही. २०२० च्या लॉकडाऊनमध्ये त्यांनी तामिळनाडूतील एका शेतकऱ्याकडून ३,५०० रुपये खर्च करून ५ प्रकारची २५ किलो भरड धान्ये मागवली. सुरुवातीला नातेवाईक आणि मित्रांना ही उत्पादने आवडल्याने ऑर्डर्स वाढू लागल्या. लॉकडाऊनमुळे वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असताना, तुषार यांनी व्हॉट्सअॅप आणि ओळखीच्या माध्यमातून ग्राहकांशी संपर्क साधला. ते स्वतः घरीच १ किलोची पाकिटे तयार करायचे आणि केवळ इंडिया पोस्टची सेवा सुरू असल्याने पोस्टाद्वारे ती देशभर पाठवायचे.

दरम्यान, मागणी वाढल्यानंतर तुषार यांनी नाशिकमध्ये अवघ्या २,००० रुपये महिना भाड्याने एक खोली घेतली. पास्ता, नूडल्स, पीठ आणि खाखरा अशा रेडी-टू-ईट उत्पादनांसाठी त्यांनी सुरुवातीला कंत्राटी उत्पादकांची मदत घेतली आणि स्वतः ब्रँडिंगवर लक्ष केंद्रित केले. कंपनीची उलाढाल पहिल्या वर्षी १. ५ लाख होती, ती पुढील वर्षी १२ लाखांवर गेली. व्यवसायाचा हा वेग पाहून केंद्र सरकारच्या PMFME योजनेअंतर्गत त्यांना १० लाख रुपयांचे अनुदान मिळाले.

या पैशांमधून त्यांनी स्वतःचा अत्याधुनिक मॅन्युफॅक्चरिंग प्लांट सुरू केला.आता स्वतःचा कारखाना सुरू झाल्यावर तुषार यांच्यासमोर मोठं आव्हान होतं. बाजरीचा खाखरा बनवताना पीठ यंत्राला चिकटत होते. अनेक तज्ज्ञांनी त्यात रासायनिक घटक वापरण्याचा सल्ला दिला, पण तुषार उत्पादनांची शुद्धता गमावण्यास तयार नव्हते. अखेर कित्येक महिन्यांच्या प्रयोगांनंतर आणि २ हजार किलो पीठ वाया गेल्यानंतर, त्यांनी कोणतीही रसायने किंवा प्रिझर्व्हेटिव्ह्ज न वापरता पूर्णपणे नैसर्गिक खाखरा बनवण्याचे तंत्र शोधले. सध्या त्यांच्या कारखान्यात ८ स्थानिक महिलांची टीम कार्यरत असून, १५ वेगवेगळ्या चवींचे खाखरे येथे तयार केले जातात.सध्या फूडोनिक कंपनी २५०० हून अधिक किरकोळ ग्राहकांना थेट सेवा देत असून, त्यांचा B2B म्हणजेच इतर व्यापाऱ्यांसोबतचा व्यवसायही वेगाने विस्तारत आहे. नाशिकच्या तुषार यांच्या या यशोगाथेतून आपल्याला एखाद्या व्यवसायासाठी भांडवल नव्हे तर जिद्द, मेहनत आणि चिकाटी महत्त्वाची असते, हे समजतं.

-संकलन –संयोजनः सुबोध रणशेवरे



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, गुरुवार, १७ सप्टेंबर 2026






**अष्टविनायक म्हणजे महाराष्ट्रातील आठ मानाची व प्रतिष्ठेची गणपतीची देवळे आहेत**

पश्चिम महाराष्ट्र व कोकणात असलेल्या ह्या देवळांना स्वतंत्र इतिहास आहे. या सर्व देवळांना पेशव्यांचा आश्रय असल्यामुळे त्यांना पेशवाईच्या काळात महत्त्व प्राप्त झाले. मुद्गल पुराणातही अष्टविनायकांचे वर्णन आढळते.
महाराष्ट्रातील या विशिष्ट 'आठ' ठिकाणच्या गणेश मंदिरांना, मूर्तींना खास महत्त्व आहे. या आठ मंदिरांस मिळून 'अष्टविनायक' म्हणले जाते. अष्टविनायकांची मंदिरे (स्थळे) महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहेत.

**गणपती ही विद्येची देवता असून तो, सुखकर्ता, दुःखहर्ता आणि रक्षणकर्ता आहे अशी गणेश भक्तांची भावना आहे.**



श्री गणेशाच्या अनेक प्रतिमा (मूर्ती) तयार केल्या गेल्या परंतु दगडावर कोरीवकाम करून निर्माण केलेल्या प्राचीन मूर्तींचा शोध ज्या ठिकाणी लागला, तसेच जेथे 'स्वयंभू' प्राचीनतम मूर्ती सापडल्या अशा स्थळांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. याच मंदिरांना अष्टविनायकांची मंदिरे समजले जाते. महाराष्ट्रातील असंख्य भाविक अष्टविनायकाची यात्रा करतात. अष्टविनायकाची सर्व मंदिरे ही अंतराच्या दृष्टीने परस्परांच्या जवळ आहेत. साधारणपणे दीड ते दोन दिवसांत ही अष्टविनायक यात्रा पूर्ण होऊ शकते. पुणे जिल्ह्यात पाच (मोरगाव, थेऊर, रांजणगाव, ओझर, लेण्याद्री), रायगड जिल्ह्यात दोन (महड, पाली) व अहमदनगर जिल्ह्यात एक (सिद्धटेक) या ठिकाणी 'अष्टविनायक स्थाने' आहेत. या गणपतींपैकी महड, सिद्धटेक व रांजणगावचा गणपती हे उजव्या सोंडेचे आहेत. बाकीचे डाव्या सोंडेचे. या सर्व गणपतींची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे -

## रांजणगावचा महागणपती

अष्टविनायकांपैकी चौथा गणपती रांजणगाव ला आहे. या गणपतीला महागणपती असे म्हणतात. हे महागणपतीचे स्वयंभू स्थान आहे. पुणे-अहमदनगर मार्गावर शिरूर तालुक्यात हे ठिकाण आहे.
या स्थानासंदर्भात एक दंतकथा आहे ती अशी की, त्रिपुरासुर या दैत्यास शिवशंकरांनी काही शक्ती प्रदान केल्या होत्या. या शक्तीचा दुरूपयोग करून त्रिपुरासुर स्वर्गलोक व पृथ्वीलोक येथील लोकांना त्रास देऊ लागला. शेवटी एक वेळ अशी आली की, शिवशंकराला श्री गणेशाचे नमन करून त्रिपुरासुराचा वध करावा लागला. म्हणून या गणेशाला 'त्रिपुरारिवदे महागणपती' असेही म्हणले जाते.
अष्टविनायकांपैकी सर्वाधिक शक्तिमान असे महागणपतीचे रूप आहे. श्री महागणपती डाव्या सोंडेचा असून गणेशाला कमळाचे आसन आहे. माधवराव पेशव्यांच्या काळात या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे इतिहासात आढळते. इंदूरचे सरदार किबे यांनीदेखील या मंदिराचे नूतनीकरण केल्याचा उल्लेख आढळतो. त्यांनी या देवळातला लाकडी सभामंडप बांधून दिला आहे. हे श्री महागणपतीचे स्थान इ.स. १० व्या शतकातील आहे. श्री गणेशाला दहा हात आहेत आणि प्रसन्न व मनमोहक अशी पूर्वाभिमुख श्रींची मूर्ती आहे.

# बीडच्या विकासाला नवी दिशा मिळणार; प्रशासन आणि ग्लोबल विकास ट्रस्ट एकत्र काम करणार

## जलनायक मयंक गांधींची जिल्हाधिकाऱ्यांशी जलसंधारण, क्रीडा आणि अनेक महत्वपूर्ण विषयांवर चर्चा!

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**





आगामी काळातील दुष्काळ सदृश्य परिस्थितीचे संकट लक्षात घेता येणारे भीषण पाणीसंकट टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून जलसंधारणाची मुबलक कामे बीड जिल्ह्यात अगोदरच करण्यात आली आहेत. यापुढेही अनेक किमी नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे काम संस्थेने हाती घेतले असून, यामध्ये प्रशासकीय सहभाग वाढावा आणि व्यापक स्वरूपातील उपाययोजना केल्या जाव्यात यासाठी ग्लोबल विकास ट्रस्ट आणि जिल्हा प्रशासन मिळून काम करणार असून, यासंदर्भात लवकरात कामाची दिशा ठरवली जाणार आहे. आज 16 सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान आणि ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्यात महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने वर्षानुवर्षे वाहणाऱ्या हंगामी नद्यांचे पुनरुज्जीवन होणे आवश्यक आहे. जेणेकरून वाहणारे पाणी थांबेल आणि थांबलेले पाणी जमिनीत मुरेल अशा स्वरूपाचे कामे करणे अपेक्षित आहे. ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने करण्यात येणारे नदी पुनरुज्जीवनाचे काम अतिशय प्रभावी ठरत असून, ग्लोबल रिव्हर आक्वाशाफ्ट पद्धतीमुळे भूगर्भ जलसाठा वाढत आहे. आगामी काळात अल निनोचे संकट अधिक गडद होण्याची चिन्हे असून अगोदरच उपाययोजना केल्या तर जलसंकटावर मात करता येईल. या विषयावर आजच्या बैठकीत महत्त्वपूर्ण चर्चा करून निर्णय घेण्यात आले. दुष्काळावर मात करण्यासाठी "मास्टर प्लॅन" आखला जाणार असून, त्यावर जिल्हा प्रशासन आणि ग्लोबल विकास ट्रस्ट एकत्र स्वरूपात काम करणार आहेत. तसेच बीड जिल्ह्यातील खेळाडूंच्या गुणवत्तेला वाव मिळावा व त्यांना योग्य व्यासपीठ मिळावे यासाठी ग्लोबल विकास ट्रस्टच्या प्रयत्नातून जे एस डब्लू फाउंडेशनच्या वतीने कबड्डी आणि कुस्तीच्या जिल्हास्तरीय स्पर्धांचे व्यापक स्तरावर आयोजन करण्यात येत असून, त्याद्वारे निवड झालेल्या खेळाडूंना जे एस डब्लू फाउंडेशन कडून प्रोत्साहन दिले जाणार असून, त्यांच्या उच्च गुणवत्तेच्या प्रशिक्षण केंद्रात मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

### ■ सिरसाळाच्या विकासाचे मुद्दे अजेंड्यावर!

सिरसाळा गावच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक मुद्द्यांवर ग्लोबल विकास ट्रस्टकडून काम केले जात आहे. पाणीप्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी संस्थेने दोन तलावांचे खोलीकरण केल्याने टंचाईमुक्त गाव झाले आहे. या तलावाच्या बाजूला नागरिकांसाठी मुक्त व्यायामशाळा उभारणीची विनंती जिल्हाधिकाऱ्यांना केली असता त्यांनी या कामाला तत्काळ मंजुरी दिली आहे. तसेच येथे उद्यान निर्मिती व क्रीडांगण उभारणीसाठीच्या उपाययोजनांना गती येणार आहे. गावच्या स्वच्छतेसाठी घंटागाडी देण्यासाठी प्रस्ताव पाठवण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केल्या आहेत.

### ■ भिलेगाव रस्त्याचा प्रश्न लागणार मार्गी!

कावळ्याची वाडी फाटा ते भिलेगाव रस्त्याचे कामकाज अनेक दिवसांपासून रखडलेल्या अवस्थेत होते. खराब अवस्थेतील रस्त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने या रस्त्याची तत्काळ दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली होती. यावर तत्काळ निर्णय घेऊन रस्त्याचे काम करावे अशी विनंती मयंक गांधी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली असता त्यांनी तत्काळ मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता यांच्याशी फोनवर चर्चा करून तत्काळ काम सुरू करण्याचे निर्देश दिले.

# बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर २८ सप्टेंबरला पाणीप्रश्नावर मोर्चा : माजी आमदार भीमराव धोंडे

## आष्टी-पाटोदा-शिरूरच्या सिंचन व पिण्याच्या पाण्यासाठी गोदावरी-कृष्णा खोऱ्यातील पाणी देण्याची मागणी

**बीड | प्रतिनिधी**



आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यांतील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, या मागणीसाठी २८ सप्टेंबर २०२६ रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. गोदावरी व कृष्णा खोरे प्रकल्पातील पाणी योग्य नियोजनाद्वारे या तीन तालुक्यांना उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केली आहे.

बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन दिल्यानंतर माजी आमदार भीमराव धोंडे यांनी हॉटेल अन्विता येथे बुधवारी पत्रकार परिषद घेतली. यावेळी माजी आमदार बाळासाहेब आजबे, दीपक घुमरे (पाटोदा तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष), भाऊसाहेब भराटे (आष्टी विधानसभा अध्यक्ष), अशोक साळवे (आष्टी तालुका अध्यक्ष, आरपीआय), नियामत बेग (माजी सभापती), अनिल जायभाये (माजी सभापती), दादासाहेब जगताप (सरपंच), ज्ञानेश्वर वाघ (सरपंच), बाळासाहेब पवार (माजी सरपंच), भागवत वारे (माजी सरपंच), सुरेश राख, बाबासाहेब ससाणे, महारुद्र खेडकर, दत्ता सातपुते यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.


माजी आमदार धोंडे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले की, या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. मोर्चाच्या दिवशी जलसंपदा विभाग, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, गोदावरी खोरे विकास महामंडळ तसेच संबंधित तांत्रिक व प्रशासकीय विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

२८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत हा मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चातील शिष्टमंडळासोबत संबंधित अधिकाऱ्यांची चर्चा घडवून आणून पाणीप्रश्नावर तातडीने ठोस कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

कमी पावसामुळे चालू खरीप हंगामातील ऊस, सोयाबीन, तूर, मूग, कापूस, उडीद आणि बाजरी या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान देण्याची मागणी आहे. तसेच जनावरांच्या चारा व पाण्यासाठी मोठ्या जनावरास १०० रुपये आणि लहान जनावरास ५० रुपये प्रतिदिन अनुदान थेट खात्यावर वर्ग करावे, अशी मागणीही माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केली आहे.

# आश्वासनाची पूर्ती ; ना. पंकजाताई मुंडेंनी मानले केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे आभार

## बर्दापूर ते लोखंडी सावरगांव रस्त्याचे रुंदीकरण होणार; १०४ कोटीची निविदा प्रसिद्ध





**बीड |** परळी मतदारसंघातील बर्दापूर ते लोखंडी सावरगांव रस्ता रुंदीकरणाला आता गती येणार असून यासाठी १०४ कोटीची निविदा तरतूद आराखड्यात करण्यात आली आहे, या कामासाठी जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.

निवडणुक प्रचाराच्या वेळी ना. पंकजाताई मुंडे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सभेत बर्दापुर ते लोखंडी सावरगाव रस्त्याचे रुंदीकरण करावे अशी मागणी केली होती, हा रस्ता अरूंद असल्याने यावर वारंवार अपघात झाले होते, त्यामुळे ही मागणी पुढे आली होती, यावर गडकरी यांनी रस्त्यासाठी लवकरच निधी देऊन काम सुरू करू असे आश्वासन दिलं होते. ना.पंकजाताईंनी या मागणीसाठी गडकरी यांची काही महिन्यापुर्वी दिल्ली येथे भेटही घेतली होती.

रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्या २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात बर्दापूर ते लोखंडी सावरगांव या एकूण १८ किमी लांबीच्या चौपदरीकरणाचा समावेश अधिकृतपणे करण्यात आला होता. आता या कामासाठी १०४ कोटींची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे, त्यामुळे हया रस्त्याचे लवकरच रुंदीकरण होणार आहे, दरम्यान, जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केल्याबद्दल ना. पंकजाताईंनी गडकरींचे आभार मानले आहेत.

## नशामुक्त भारत अभियानाला मिळणार नवी गती

# DJJSच्या 'बोध-नशा उन्मूलन कार्यक्रम'चा केंद्र सरकारसोबत दोन वर्षांचा सामंजस्य करार

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**



नशेच्या वाढत्या समस्येविरोधात जनजागृती आणि नशामुक्त समाजनिर्मितीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून दिव्य ज्योति जाग्रती संस्थान (DJJS) यांच्या 'बोध–नशा उन्मूलन कार्यक्रम' या उपक्रमाचा भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयासोबत दोन वर्षांचा सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे. हा करार नशामुक्त भारत अभियान (NMBA) अंतर्गत करण्यात आला आहे.

या सामंजस्य करारामुळे नशेच्या दुष्परिणामांविषयी समाजातील विविध घटकांमध्ये व्यापक जनजागृती करण्यास तसेच विशेषतः युवकांना नशेपासून दूर ठेवून सकारात्मक व निरोगी जीवनशैलीकडे वळविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप मिळणार आहे.

DJJSच्या 'बोध–नशा उन्मूलन कार्यक्रम' अंतर्गत जनजागृती अभियान, समुपदेशन, प्रशिक्षण व मार्गदर्शन कार्यक्रम, व्याख्याने तसेच विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून नशेच्या दुष्परिणामांविषयी माहिती देण्यात येते. नशेपासून दूर राहण्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करणे आणि समाजातील विविध घटकांना नशामुक्त जीवन जगण्यासाठी प्रेरित करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून युवक, विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच समाजातील विविध घटकांपर्यंत नशामुक्तीचा संदेश पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे. नशेच्या आहारी जाण्यापासून युवकांचे संरक्षण करण्यासाठी जनजागृतीसोबतच सकारात्मक विचार, मूल्याधिष्ठित जीवनशैली आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित करण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत.

यावेळी DJJSच्या साध्वी शिताभा भारती, ग्लोबल कोऑर्डिनेटर, बोध–नशा उन्मूलन कार्यक्रम यांनी नशेची समस्या ही केवळ व्यक्तीपुरती मर्यादित नसून तिचा परिणाम कुटुंब आणि संपूर्ण समाजावर होत असल्याचे नमूद केले.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)